Celebrating Cinema
PIFF Pune International Film Festival

# बी. पी. सिंग, विक्रम गोखले यांचा पिफ दरम्यान विशेष सन्मान

- ज्येष्ठ संगीत दिग्दर्शिका उषा खन्ना यांना 'एस. डी. बर्मन इंटरनॅशनल अवॉर्ड फॉर क्रिएटिव्ह म्युझिक अ‍ॅण्ड साउंड' जाहीर
- येत्या ९ जानेवारीला बालगंधर्व रंगमंदिर येथे भव्य समारंभात होणार महोत्सवाचे उद्घाटन
- मराठी स्पर्धात्मक विभागातील चित्रपट व ट्रायबल शॉर्ट फिल्म कॉम्पिटिशनमधील चित्रपटांची नावे जाहीर

पुणे, ३ जानेवारी, २०२० : भारतीय चित्रपटसृष्टीसाठी दिलेल्या अद्वितीय योगदानाबद्दल अनेक हिंदी मालिकांचे दिग्दर्शक असलेल्या बी. पी. सिंग आणि अभिनेते विक्रम गोखले यांना १८ व्या 'पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'त 'पिफ डिस्टिंग्विश्ड अ‍ॅवॉर्ड' हा विशेष पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. तर ज्येष्ठ संगीत दिग्दर्शिका उषा खन्ना यांना या वर्षीचा 'एस. डी. बर्मन इंटरनॅशनल अवॉर्ड फॉर क्रिएटिव्ह म्युझिक अ‍ॅण्ड साउंड' या पुरस्कार देत सन्मानित केले जाणार असल्याची घोषणा महोत्सवाचे अध्यक्ष व संचालक डॉ. जब्बार पटेल यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

पुणे फिल्म फाऊंडेशनचे विश्वस्त रवी गुप्ता, महोत्सवाचे कलात्मक दिग्दर्शक समर नखाते, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, ट्रायबल रिसर्च अ‍ॅण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट च्या सहआयुक्त नंदिनी अवाडे या वेळी उपस्थित होते.

'पुणे फिल्म फाऊंडेशन' आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केल्या जाणा-या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे हे १८ वे वर्ष असून 'महाराष्ट्राचे हिरक महोत्सवी वर्ष' ही यावर्षीची 'थीम' आहे. येत्या गुरूवारी दि. ९ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता जंगली महाराज रस्त्यावरील बालगंधर्व रंगमंदिर येथे महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येणार असून यावेळी बी. पी. सिंग, विक्रम गोखले आणि उषा खन्ना यांना वरील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी सीआयडी या मालिकेत भूमिका साकारलेले अभिनेते शिवाजी साटम, आदित्य श्रीवास्तव आणि दयानंद शेट्टी यांच्याबरोबर प्रसिद्ध मराठी अभिनेत्री मुक्ता बर्वे यांची खास उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमानंतर जुआन होजे कँपानेला दिग्दर्शित 'द विझल्स टेल' हा अर्जेंटीनाचा चित्रपट महोत्सवाची 'ओपनिंग फिल्म' म्हणून लॉ कॉलेज रस्ता व कोथरूड येथील एनएफएआयमध्ये दाखविला जाईल, अशी माहितीही डॉ. पटेल यांनी यावेळी दिली.

आज झालेल्या पत्रकार परिषदेत मराठी स्पर्धात्मक चित्रपटांच्या नावांची घोषणा देखील करण्यात आली. या विभागात निवड झालेले मराठी चित्रपट पुढीलप्रमाणे –
१ ) 'तुझ्या आईला (शिवी नाय, खेळाचं नाव हाय ते)' – दिग्दर्शक सुजय सुनिल डहाके,
२) 'चिवटी' – दिग्दर्शक राजकुमार लक्ष्मणराव तांगडे, ३) 'वाय'- दिग्दर्शक अजित सूर्यकांत वाडीकर,
४) 'फोटो प्रेम' – दिग्दर्शक आदित्य राठी व गायत्री पाटील, ५) 'स्माईल प्लीज' – दिग्दर्शक विक्रम फडणीस,
६) 'बोन्साई' – दिग्दर्शक समीर आशा पाटील, ७) 'आनंदी गोपाळ' – दिग्दर्शक समीर संजय विद्वांस

याबरोबरच यावर्षी पहिल्यांदाच ट्रायबल रिसर्च अँण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट शॉर्ट फिल्म कॉम्पिटिशन देखील आयोजकांकडून जाहीर करण्यात आली होती.

यांमधील लघुपटांची नावे पुढीलप्रमाणे – १) 'सोयरिक' (दिग्दर्शक - बंडुराव वसंत जाधव), २) 'थालकाठी' (दिग्दर्शक – विवेक पी कुलकर्णी), ३) तारपा (दिग्दर्शक - विशाल एकनाथ बर्डे), ४) थाळी वाद्य (दिग्दर्शक - पवन प्रभाकर धावरे), ५) 'चंकी सोकडा' (दिग्दर्शक - धर्मा वानखडे), ६) 'रानी बेटी' (दिग्दर्शक - धर्मा वानखडे), ७) 'मूळ' (दिग्दर्शक - सुयोग देशपांडे), ८) 'पडकाई ' (दिग्दर्शक - अमर मेलगिरी), ९) 'थालसर- बंगसर' (दिग्दर्शक - आर एम जाधव), १०) 'द मायटी गॉट्स- ब्रिक्स ऑफ चंदगड' (दिग्दर्शक –विपलव सुभाष शिंदे), ११) 'नंदी बैल' (दिग्दर्शक - राहुल रामचंद्र पवार), १२) 'भांगासार थाल' (दिग्दर्शक- राहुल रामचंद्र पवार), १३) 'आर्ट ऑफ लाईफ' (दिग्दर्शक- सायली तनपुरे), १४) 'तारपा- ऑर्गन्स ऑफ अँन इनोसंट कल्चर' (दिग्दर्शक – मनोज अप्पासो जाणवेकर), १५) 'वनोपचार आदिवासींचा' (दिग्दर्शक- प्रशांत काढे)

या वर्षी 'पिफ डिस्टिंग्विश्ड अँवॉर्ड' जाहीर झालेले बी. पी. सिंग अर्थात ब्रिजेंद्र पाल सिंग हे भारतीय चित्रपट सृष्टीतील एक यशस्वी निर्माते व दिग्दर्शक आहेत. देशात सर्वाधिक काळ म्हणजे तब्बल २१ वर्षे सुरु राहणारी मालिका हा विक्रम नोंदविलेल्या 'सीआयडी' या मालिकेचे ते निर्माते व दिग्दर्शक आहेत. याच मालिकेत त्यांनी डीसीपी चित्रोले हे पात्र देखील साकारले आहे. याशिवाय सोनी टीव्ही वरील 'आहट' ही भयपट मालिका आणि इतर मालिकांचे दिग्दर्शन देखील त्यांनी केले आहे. पुण्यातील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे अध्यक्ष म्हणून ते सध्या जबाबदारी पार पाडत आहेत.

तर दुसरे पुरस्कार विजेते विक्रम गोखले हे मराठी नाट्य-चित्रपट क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेते आहेत. चित्रपट, मालिका व नाटक अशा तीनही माध्यमांतून त्यांनी काम केले असून अभिनयासोबतच लेखन, दिग्दर्शन क्षेत्रात देखील त्यांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'आघात' हा चित्रपटाचे समीक्षकांकडून विशेष कौतुक झालेले आहे. २०१३ साली प्रदर्शित झालेल्या 'अनुमती' या चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. त्यांनी मराठी बरोबरच हिंदी चित्रपट आणि मालिकांमध्येही काम केलेले आहे. घरातूनच अभिनयाचे बाळकडू मिळालेल्या विक्रम गोखले यांनी 'कथा', 'कमला', 'जावई माझा भला', 'दुसरा सामना', 'समोरच्या घरात', 'सरगम', 'स्वामी' या नाटकांबरोबरच 'आघात','आधारस्तंभ', 'दे दणा दण', 'नटसम्राट', 'माहेरची साडी','लपंडाव', 'सिद्धांत' या मराठी चित्रपटात भूमिका साकारल्या आहेत. 'स्वर्ग नरक', 'हम दिल दे चुके सनम', 'हसते हसते', 'हे राम' यांसारख्या अनेक हिंदी चित्रपटांमध्ये देखील त्यांनी भूमिका निभावल्या आहेत. 'अकबर बिरबल', स्टार प्रवाहवरील 'अग्निहोत्र', 'अल्पविराम', दूरदर्शन वरील 'उडान', 'कुछ खोया कुछ पाया', 'जीवनसाथी', 'द्विधाता', 'मेरा नाम करेगा रोशन', झी मराठी वरील 'या सुखांनो या', 'विरुद्ध', 'संजीवनी' व 'सिंहासन' या त्यांच्या मालिकाही खूप गाजल्या.

यानंतर ज्येष्ठ संगीत दिग्दर्शिका उषा खन्ना यांना 'एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय क्रिएटिव्ह म्युझिक अँण्ड साउंड अँवार्ड'ने सन्मानित करण्यात येणार आहे. संगीत क्षेत्रातील मोलाच्या योगदानासाठी त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत सुरुवातीच्या काळातील संगीत दिग्दर्शन क्षेत्रात पाय रोवणा-या महिला संगीतकार म्हणून उषा खन्ना ओळखल्या जातात. 'एक सपेरा, एक लुटेरा' चित्रपटातील 'हम तुमसे जुदा हो के...' 'छोडो कल की बातें', 'शायद मेरी शादी का खयाल', 'जिंदगी प्यार का गीत है', 'आप तो ऐसे ना थे' ही गाणीच उषा खन्ना यांची ओळख आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. गेली ४० वर्षे यशस्वीपणे त्या संगीत दिग्दर्शन क्षेत्रात कार्यरत आहेत. १९८३ साली आलेल्या 'सौतन' चित्रपटासाठी त्यांना फिल्म फेअर पुरस्काराने देखील गौरविण्यात आले आहे.